॥ बहुजन हिताय । बहुजन सुखाय ॥

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | सोमवार दि १० ऑगस्ट २०२६ (विशेष अंक) | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३३ वा

# बाजार समिती आवारातून शेतकऱ्याच्या अडीच लाख रुपयाची चोरी

## बँकेतून पैसे काढणाऱ्यांवर चोरट्यांची नजर; वाहनाच्या उघड्या काचेतून चोरट्यांनी साधला डाव

सांगोला : सांगोला कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात उभ्या असलेल्या वाहनातील अडीच लाख रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रवींद्र महादेव तेली (वय ४५, रा.सोनंद, ता. सांगोला) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. ते शेती व्यवसाय करतात. ५ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे ३.५५ वाजता त्यांनी स्टेट बँक, सांगोला येथून २ लाख ५० हजार रुपये काढले. ही रोकड पिवळ्या रंगाच्या प्लास्टिकच्या कॅरीबॅगमध्ये ठेवून आपल्या वाहनाच्या डॅश बोर्डजवळील कप्प्यात ठेवली. त्यानंतर ते सांगोला कृषी उत्पन्न बाजार समितीतील एका फ्रूट कंपनी येथे डाळिंब विक्रीसाठी गेले. वाहन लॉक करून डाळिंब उतरविण्याचे काम सुरू असताना सायंकाळी सुमारे ६.४० वाजता ते परत वाहनाजवळ आले असता वाहनाच्या डाव्या बाजूची काच अर्धवट उघडी असल्याचे त्यांच्या निर्दर्शनास आले. तपासणी केली असता डॅशबोर्डमध्ये ठेवलेली रोकड असलेली कॅरीबॅग गायब असल्याचे आढळून आले. अज्ञात चोरट्याने वाहनाच्या अर्धवट उघड्या काचेतून हात घालून रोकड असलेली कॅरीबॅग चोरून नेल्याची फिर्याद देण्यात आली आहे.

चोरीस गेलेल्या रकमेमध्ये ५०० रुपयांच्या ४ बंडल (प्रत्येकी १०० नोटा) आणि १०० रुपयांच्या ५ बंडल (प्रत्येकी १०० नोटा)असा एकूण २ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

या पार्श्वभूमीवर शहरातील संवेदनशील भागांमध्ये पोलीस गस्त वाढविणे, साध्या वेशातील पोलिसांची नियुक्ती करणे, सीसीटीव्हीच्या माध्यमातून संशयितांवर बारकाईने लक्ष ठेवणे आणि प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा तातडीने छडा लावणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. चोरट्यांवर वेळीच वचक बसवला नाही, तर अशा घटनांमध्ये

# श्रमिक दिनानिमित्त लोकनृत्य स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालय व न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेजमध्ये ३६ संघांचा सहभाग

सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते, माजी पणन व रोजगार हमी मंत्री स्वर्गीय आमदार डॉ. भाई गणपतराव देशमुख यांची जयंती 'श्रमिक दिन' म्हणून साजरी केली जाते. त्यांच्या ९९व्या जयंतीनिमित्त डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय व न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज, सांगोला यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या लोकनृत्य स्पर्धेला विविध गटांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत प्राथमिक, पूर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील तब्बल ३६ संघांनी सहभाग नोंदविला. लोकनृत्य स्पर्धेचे उद्घाटन संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे यांच्या शुभहस्ते मंचास श्रीफळ अर्पण करून करण्यात आले.

प्रारंभी स्वर्गीय आमदार डॉ. गणपतराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाद्वारे विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रस्तावना करीत असताना संस्था सदस्य प्रा. डॉ. अशोकराव शिंदे यांनी सांगितले की, स्वर्गीय आबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे चालू ठेवण्याबरोबरच तालुका व परिसरातील विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या शैक्षणिक संकुलातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन गटातील विद्यार्थी केवळ आपली कला सादर करतील; मात्र ते स्पर्धेचे स्पर्धक म्हणून सहभागी होणार नाहीत. त्यामुळे तालुक्यातील इतर शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्पर्धेत सहभागी होण्याची अधिक संधी मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या शैक्षणिक संकुलातील सहभागी विद्यार्थ्यांचा १५ ऑगस्ट रोजी संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख व संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे यांच्या शुभहस्ते विशेष सन्मान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना संस्था सचिव विठ्ठलराव शिंदे यांनी स्वर्गीय डॉ. गणपतरावजी देशमुख यांच्या प्रदीर्घ सामाजिक, शैक्षणिक व लोककल्याणकारी कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. आबासाहेबांनी जपलेली श्रम, शिक्षण, सामाजिक बांधिलकी आणि सर्वसामान्यांच्या विकासाची विचारधारा पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. त्यांच्या विचारांचा प्रवाह अखंडित ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. लोकनृत्य स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले असून, पारंपरिक लोककला, संस्कृती आणि सामाजिक संदेश यांचा सुंदर संगम या स्पर्धेत पाहावयास मिळाला. उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

श्रमिक दिनानिमित्त आयोजित मॅरेथॉन, वक्तृत्व, रंगभरण व लोकनृत्य स्पर्धांच्या पारितोषिक वितरण समारंभास प्रसिद्ध साहित्यिक व थोर विचारवंत प्रा.डॉ.चंद्रकांत चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख राहणार आहेत. या कार्यक्रमास सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, सचिव तसेच सर्व संस्था सदस्य उपस्थित राहणार आहेत. श्रमिक दिनाच्या या विशेष कार्यक्रमास सांगोला तालुका व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.शंकर धसाडे तसेच न्यू इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. केशव माने यांनी केले.

# सांगोला तालुक्यातील वाढत्या चोऱ्या व घरफोड्या बाबत नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज : पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे

## पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

सांगोला : सांगोला तालुक्यात घरफोडी व मालमत्तेविषयक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सांगोला पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृतीपर सूचना प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागरिकांनी घर बंद करून बाहेरगावी जाताना घरातील मौल्यवान दागिने, रोख रक्कम नातेवाईकांकडे अथवा बँकेतील लॉकरमध्ये सुरक्षित ठेवावी. तसेच गावात कार्यक्रम अथवा समारंभ असल्यास अनेक नागरिक घरे बंद करून जात असल्याने घरफोडीची शक्यता वाढते. त्यामुळे घराच्या सुरक्षेबाबत विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय, जास्त दिवस घराबाहेर जाणार असल्यास शेजाऱ्यांना याची माहिती द्यावी. गावात अथवा परिसरात संशयित व्यक्ती आढळल्यास तात्काळ पोलिस स्टेशनला कळवावे. शक्य असल्यास संबंधित व्यक्तीचे छायाचित्र घेऊन त्यांची ओळख व आधारकार्डची खात्री पोलिस पाटील यांच्या माध्यमातून करून घ्यावी, असेही सूचित करण्यात आले आहे.

गावाबाहेरील वस्त्यांवर राहणाऱ्या नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी. मालमत्तेविषयक गुन्हे

करणाऱ्या इसमांबाबत कोणतीही माहिती असल्यास ती गोपनीयरीत्यापोलिस स्टेशनला द्यावी, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.

''सतर्क नागरिक सुरक्षित समाज'' हा संदेश देत नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करून गुन्हेगारी रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक राहुल देशपांडे यांनी केले आहे.

# कोळा येथे स्व.आ.भाई डॉ.गणपतराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी

सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते, स्वर्गीय आमदार भाई डॉ.गणपतराव देशमुख (आबासाहेब) यांच्या शताब्दी जयंती वर्षा निमित्त आयोजित आरोग्य तपासणी शिबिरास कोळा पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा उदंड प्रतिसाद लाभला असून सदरचे शिबिर दक्षता हॉस्पिटल, श्री हॉस्पिटल आणि आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख मेडिकल फॅकल्टी यांच्या संयुक्त विद्यमाने कोळा ग्रामस्थांच्या पुढाकाराने संपन्न झाले.

या शिबिरामध्ये मोफत सर्वरोग, मुतखडा व मूत्ररोग तपासणी करण्यात आले असून गरजू रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया शिबिरा अंतर्गत मोफत करण्याचे आयोजन करण्यात आले.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी स्व. आबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन या वेळी जेष्ठ नेते तुकाराम दादा आलदर यांच्या शुभ हस्ते झाले.उद्घाटन प्रसंगी कोळा पंचक्रोशीतील सर्व नेते मंडळी तसेच या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य श्री.सोपान दाजी कोळेकर, सूत गिरणीचे संचालक श्री कुंडलिक आलदर सर, दिलीप देशमुख, माजी सरपंच मारुती सरगर सर, माजी सरपंच शहाजी हातेकर, माजी पंचायत समिती सदस्य श्री सीताराम सरगर, माजी ग्रा. प. सदस्य रमेश नाना कोळेकर, ग्रा प सदस्य शिवाजी आलदर, माजी उपसरपंच डॉ.सादिक पटेल, अशोक आबा आलदर, ग्रा. प. सदस्य दिलीप कोळेकर, ग्रा.प.सदस्य दगडू कोळेकर, ॲड. दह्याप्पा आलदर, ॲड निलेश मदने, युवा नेते दत्ता सरगर, बाळासाहेब कोळेकर, अंबादास सरगर डॉ.बापूसाहेब सरगर, श्रीमती वंदना संजय सरगर, जुनोनी सोसायटीतचे चेअरमन बंडू व्हनमाने, युवक कार्यकर्ते अेर खाटीक, तुषार माने, दक्षता हॉस्पिटलच्या वतीने डॉ.किरण संजय सरगर-मस्के , डॉ. निरंजन केदार, श्री हॉस्पिटलचे डॉ. सागर तेली दक्षता हॉस्पिटल चा सर्व नर्सिंग स्टाफ ,धनराज म्बुलन्सचे श्री.सचिन चांदणे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिरात विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. तसेच मूत्ररोगाच्या रुग्णांची तपासणी करून आवश्यक त्या उपचारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. गरजू रुग्णांना शस्त्रक्रियेसंदर्भातही सल्ला देण्यात आला.

# सोलापूर जिल्हा परिषदेत ५०० शिक्षकांची भरती

## शिक्षणक्षेत्राला मिळणार नवी बळकटी-सभापती चेतनसिंह केदार-सावंत

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत ५०० शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती प्रक्रिया 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, सदर भरतीची जाहिरात दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर व्हावी आणि प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व्हावी, यासाठी ही शिक्षक भरती अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शिक्षण हा विकासाचा पाया आहे. जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे ही आमची प्राथमिकता असून, शिक्षकांची उपलब्धता वाढवून ग्रामीण भागातील शैक्षणिक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी जिल्हा परिषद कटिबद्ध आहे, असे मत सभापती, शिक्षण व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. चेतनसिंह केदार-सावंत यांनी व्यक्त केले.

या भरतीमुळे जिल्ह्यातील शाळांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळणार आहे. पात्र उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेली जाहिरात वाचून आवश्यक पात्रता व अटींची पूर्तता करून भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने ५०० शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू होत आहे. 'पवित्र पोर्टल'च्या माध्यमातून ही भरती पारदर्शक पद्धतीने राबविण्यात येणार असून, दि. ६ ऑगस्ट २०२६ रोजी भरतीची जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, शाळांना आवश्यक शिक्षक उपलब्धता आणि शिक्षण व्यवस्थेला अधिक बळकटी देणे, हा या भरतीमागील प्रमुख उद्देश आहे,असे श्री. चेतनसिंह केदार-सावंत यांनी सांगितले.

# सांगोल्याच्या मतदार यादीचे शुद्धीकरण; ३४ हजार १६ मतदार मृत, दुबार अथवा स्थलांतरित ३ लाख ४५ हजार ३९५ मतदारांनी दिले गणना फॉर्म

## ३ लाख ११ हजार ३७९ मतदारांचे मॅपिंग पूर्ण

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघातील विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षणाची (एसएसआर) मोहीम निर्धारित मुदतीत पूर्ण झाली आहे. या मोहिमेदरम्यान मतदार यादीची पडताळणी करताना ३४ हजार १६ मतदार मृत, दुबार अथवा स्थलांतरित असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आगामी काळात मतदार यादी अधिक अचूक व अद्ययावत होण्याची शक्यता आहे.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील २५३ मतदान केंद्रांवरील ३ लाख ४५ हजार ३९५ मतदारांना गणना फॉर्म देण्यात आले होते. त्यापैकी ३ लाख ११ हजार ३७९ मतदारांनी गणना फॉर्म भरून दिले असून त्यांचे मॅपिंगही पूर्ण करण्यात आले आहे. मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामासाठी मतदार नोंदणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक मतदार नोंदणी अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, ग्रामसेवक, शिक्षक, महसूल कर्मचारी, अंगणवाडी सेविका तसेच पोलीस पाटील यांनी सहभाग घेतला.

सांगोला विधानसभा मतदारसंघातील विशेष दरम्यान, पडताळणीत मृत, दुबार अथवा स्थलांतरित आढळलेल्या मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर संबंधित स्थलांतरित मतदारांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत. त्यानंतर संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाणार असून, प्राप्त दावे-हरकतींची सुनावणी करण्यात येईल. आवश्यक पुराव्यांच्या आधारे संपूर्ण तपासणी केल्यानंतरच अंतिम मतदार यादी तयार केली जाणार आहे. - बाळूताई भागवत, तहसीलदार, सांगोला

संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षणाची मोहीम २१ जून २०२६ रोजी सुरू करण्यात आली होती.

या मोहिमेसाठी सुरुवातीला २३ जुलै ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर वाढीव मुदत देऊन ६ ऑगस्टपर्यंत पुनरीक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले. वाढीव मुदतीत हे काम १०० टक्के पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

विनम्र अभिवादन !!



शेतकरी कष्टकरी जनतेचे नेते,सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते,
अनेक सहकारी संस्थांचे मार्गदर्शक,माणदेश भूषण,
शे.का. पक्षाचे जेष्ठ नेते आमचा स्वाभिमान
स्व.मा.आ.भाई
गणपतरावजी देशमुख
यांना जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
॥ अभिवादक ॥
ॲड.संजीवकुमार शिंदे
माजी नगरसेवक,सांगोला नगरपरिषद,सांगोला
शिंदे परिवार,सांगोला

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४१ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# आबासाहेबांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; १०१ हून अधिक रक्तदात्यांनी केले रक्तदान

सांगोला : सांगोला तालुक्याचे भाग्यविधाते स्वर्गीय आ.भाई डॉ. गणपतरावजी (आबासाहेब) देशमुख यांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय, सांगोला येथील राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभाग तसेच न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज, सांगोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात १०१ हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान करून स्वर्गीय डॉ.गणपतरावजी देशमुख यांचे विचार तेजस्वी करण्याचा व जिवंत ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ. मकरंद येलपले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिकेत देशमुख, संस्थेचे सचिव श्री. विठ्ठलराव शिंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर धसाडे, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक श्री. केशव माने, संस्थेचे संचालक श्री. अशोक शिंदे व श्री. दीपक खटकाळे, एनएसएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. जोतिबा हुरदुखे, एनसीसी विभाग प्रमुख प्रा. डॉ. जगन्नाथ ठोंबरे, श्री. संतोष राजगुरू, उपमुख्याध्यापिका श्रीमती वैशाली घोडके, उपप्राचार्य श्री. संतोष जाधव यांच्यासह महाविद्यालय व ज्युनिअर कॉलेजमधील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, एनसीसी कॅडेट्स, एनएसएस स्वयंसेवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी डॉ.मकरंद येलपले आणि श्री. विठ्ठलराव शिंदे यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट करताना 'रक्तदान हेच जीवनदान' असल्याचे सांगितले. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, प्रसूतीदरम्यान रक्ताची गरज असणाऱ्या माता तसेच विविध आजारांमुळे रक्ताची आवश्यकता असलेल्या रुग्णांसाठी रक्तदान अत्यंत महत्त्वाचे आहे. एका व्यक्तीने केलेले रक्तदान अनेक गरजूंच्या जीवनासाठी आधार ठरू शकते. त्यामुळे युवकांनी रक्तदानाबाबतचे गैरसमज दूर करून नियमितपणे रक्तदान करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ.अनिकेत देशमुख यांनी सांगितले की, स्वर्गीय डॉ. गणपतराव देशमुख यांनी आयुष्यभर 'माणूस आणि समाज केंद्रस्थानी' ठेवून कार्य केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी युवकांची आहे. स्वर्गीय साहेबांच्या ९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित या रक्तदान शिबिरात १०१ हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून केवळ रक्तदान केले नाही, तर आबासाहेबांचा सेवाभाव, मानवतावादी दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकीचा विचार पुढे नेण्याचा संकल्प प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केला, असे त्यांनी नमूद केले. या रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सांगोला ब्लड बँकेचे संस्थापक श्री. संजय सरक महादेव यांनी विशेष सहकार्य केले.

रक्तदान शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जोतिबा हुरदुखे, राष्ट्रीय छात्र सेना विभाग प्रमुख प्रा. डॉ. जगन्नाथ ठोंबरे, न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे श्री. संतोष राजगुरू व इतर सदस्य, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एनसीसी कॅडेट्स आणि एनएसएस स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# राज्य ग्रंथालय संघाच्या प्रमुख कार्यवाहपदी ग्रंथमित्र गुलाबराव पाटील

सांगोला : महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाची महत्वपूर्ण राज्य कार्यकारिणी बैठक नुकतीच कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्यालयात पार पडली. या बैठकीत राज्य ग्रंथालय संघाच्या प्रमुख कार्यवाहपदी ग्रंथमित्र गुलाबराव पाटील (सांगोला) तर कार्याध्यक्षपदी ग्रंथमित्र सोपानराव पवार (पुणे) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

सांगोला तालुका ग्रंथालय संघाचे संस्थापक ग्रंथमित्र गुलाबराव पाटील गुरुजी यांची गत रविवारी सोलापूर जिल्हा प्रा.शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादीत सोलापूर व्हा.चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल ही त्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करण्यात आले. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघातर्फे सत्कार करण्यात आला. ग्रंथालय चळवळ अधिक बळकट करण्यासाठी बैठकीत अनेक महत्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. ग्रंथमित्र डॉ.गजानन कोटेवार यांनी मार्गदर्शन करताना राज्यातील ग्रंथालय चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

या प्रसंगी पांडुरंग सूर्यवंशी, एस.एस.पाटील, किशोर जाधव, दिलीप कोरे, मंगेश मस्के, रवींद्र कालेकर, रमेश सुतार, राजू ढमाले, मधुकर सुतार व पुष्पा पाटील यांसह राज्यभरातील मान्यवर उपस्थित होते.

स्वागत कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष सुशांत मगदूम यांनी केले. प्रास्ताविक राज्य संघाचे कोषाध्यक्ष भीमराव पाटील यांनी मांडले, तर कार्योपध्यक्ष ग्रंथमित्र राम मेखले यांनी उपस्थितांचे आभार मानले.






# विनम्र अभिवादन !!

ऋषितुल्य नेतृत्व, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते

## स्व.मा.आ.भाई गणपतरावजी देशमुख

यांच्या ९९ व्या जयंती निमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !!!

स्व.आम.भाई गणपतरावजी देशमुख

चेअरमन, आर.डी.सी.सी.बँक

मा.आ.जयंतराव पाटील

## अभिवादक

घर बांधायचे आहे ....नविन गाडी खरेदी करायची आहे,
शेतीसाठी व मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी कर्ज घ्यायचे आहे?

आपले स्वप्न साकार करण्यासाठी सदैव तत्पर.......
आपली जिव्हाळ्याची बँक

सहकारनिष्ठ, सहकार भूषण आणि ....
सहकारातील सर्वोच्च असा
सहकारमहर्षी पुरस्कार मिळविणारी
महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा मध्यवर्ती बँक

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अलिबाग

केंद्र कार्यालय : चेंढरे-अलिबाग
फोन : ०२१४१-२२४३१५,२२४३१६
Email - rdccpen@gmail.com Web - www.rdccbank.com

mahendra 8149981148